# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

जा.क्र./पोउआ/वाह/ १६६८ /२०२५ पुणे दिनांक २७/२/२०२५

पुणे शहरातील येरवडा वाहतूक विभागांतर्गत शास्त्रीनगर चौक व कल्याणीनगर जंक्शन चौकातील वाहतुक कोंडी सोडवण्यासाठी व वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. "सदर ठिकाणी यापर्वी काही आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे".

**<u>येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत कल्याणीनगर जंक्शन चौकातील वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.</u>**

- **सह्याद्री लेन/ लुप रोड/ गुंजन चौक मार्गे येवुन कल्याणीनगर कडे जाणाऱ्या वाहनांना कल्याणीनगर जक्शंन येथील उजवी कडील वळण ( राईट टर्न ) बंद करण्यात येत आहे.**
- **सह्याद्री लेन/ लुप रोड/ गुंजन चौक मार्गे येवुन कल्याणीनगर कडे जाणाऱ्या वाहनांनी रामवाडीच्या दिशेने ३०० मीटर पुढे जाऊन आगाखान पॅलेसचे समोरील पंक्चर मधुन युटर्न घेवुन डाव्या बाजुने कल्याणीनगर कडे जावे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक २७/२/२०२५ ते दिनांक १३/३ /२०२५ पर्यत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उपआयुक्त वाहतूक विभाग, पुणे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे.

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २) **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी येरवडा** वाहतुक विभाग, पुणे शहर.

२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.